## आय.सी.एस्.महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन

**खेड** - शहराजवळील भडगांव-खोंडे येथील सहजीवन शिक्षण संस्थेच्या आय.सी.एस. महाविद्यालयात नुकतेच भूगोल, कॉमर्स आणि माहिती तंत्रज्ञानातील नवप्रवाह आणि शाश्वत विकास यावर आधारित एकदिवशीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात,पंजाब येथील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक सहभागी झाले होते. दि बॉम्बे जिऑग्राफीकल असोसिएशन आणि आय.सी.एस.महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी मंगेशभाई बुटाला, अॅड. आनंदराव भोसले, डॉ. सवितस्मिता चव्हाण, श्री. तेलंग, प्रा. भारती उन्नी, भाऊ काटदरे, डॉ. हेमंत पेडणेकर, सुधीर पुराणिक, प्रा. असिम रामपुरवाला, श्री. देवकर, डॉ. प्रसाद भणगे, डॉ.जी.बी.सारंग मान्यवर उपस्थित होते.

09 Mar. 20 Dainik Sagar

## आय.सी.एस.कॉलेजमधील भूगोल स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**खेड** - शहराजवळील भडगांव-खोंडे येथील आय.सी.एस.कॉलेजमध्ये भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी बॉम्बे जिऑग्राफीकल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच सी. कणी मेमोरिअल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे आय.सी.एस. चे प्राचार्य डॉ. जी.बी.सारंग उपस्थित होते. बॉम्बे जिऑग्राफीकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. सवितस्मिता चव्हाण, उपाध्यक्ष प्रा. तेलंग, सेक्रेटरी प्रा. भारती उन्नी उपस्थित होत्या. विविध महाविद्यालयातील भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होते.

09. Mar. 20 Dainik Sagar

# आयसीएस महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद

## १० हून अधिक प्राध्यापकांचा सहभाग

**खेड / प्रतिनिधी :** सहजीवन शिक्षण संस्था संचालित आयसीएस महाविद्यालयात भूगोल, कॉमर्स आणि माहिती तंत्रज्ञान नवप्रवाह आणि शाश्वत विकास या विषयावर आधारित एक दिवसीय परिसंवाद पार पडला. यावेळी संस्थेचे सेक्रेटरी मंगेशभाई बुटाला. गव्हर्निंग कॉन्सिलचे चेअरमन अॅड. आनंदराव भोसले, बॉम्बे जिऑग्राफिकल असो.च्या अध्यक्षा सविता स्मिता चव्हाण, उपाध्यक्ष तेलंग, सेक्रेटरी प्रा. भारती उन्नी, सह्याद्री निसर्ग मित्रचे अध्यक्ष भाऊ काटदरे, प्राचार्य डॉ. हेमंत पेडणेकर, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक सुधीर पुराणिक, विद्यालंकार महाविद्यालाचे उपप्राचार्य प्रा. असिम रामपुरवाला, प्रा. देवकर, सहजीवन शिक्षण संस्थेचे मदनभाई सुरा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट डायरेक्टर डॉ. प्रसाद भणगे, आयसीएस महाविद्यालसाचे प्राचार्य डॉ. जी. बी. सारंग आदी मान्यवर उपस्थित होते.

महाविद्यालयाचे गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन . अॅड. आनंदराव भोसले यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. संस्था सेक्रेटरी मंगेशभाई बुटाला यांनी परिसंवादाचे स्वागत करून अशाप्रकारच्या राष्ट्रीयस्तरीय परिसंवादाचे आयोजन आमच्या महाविद्यालयात होत आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. अशाप्रकारच्या राष्ट्रीयस्तरीय परिसिंवादामुळे विचारांची देवाणघेवाण होते. हे महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक बाब आहे, असे सांगून परिसंवादाला शुभेच्छा दिल्या.

या परिसंवदामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, पंजाब, गुजरात येथील विविध महाविद्यालयाचे प्राध्यापक असे एकूण जवळपास ९० हून अधिक संशोधन पेपरचे प्राध्यापकांनी सहभाग घेतला. या परिसवांदातील प्रमुख मार्गदर्शक सह्याद्री निसर्ग मित्र अध्यक्ष भाऊ काटदरे यांनी वन्यजीव, जैवविविधता आणि शाश्वत विकासासाठी कसे प्रयत्न कसे करावेत. याबाबतची सचित्र माहिती देऊन सह्याद्री निसर्ग मित्र संस्थेच्या वतीने राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहीती दिली. पुस्तकी ज्ञानाबरोबरच पर्यावरण संबधी प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्य परिचयामुळे उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांना अतियश उपयुक्त मार्गदर्शन मिळाले. परिसवांद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या भूगोल विभागचे प्रमुख डॉ. अनिता आवटी, डॉ. डी. डी. आगम, कॉमर्स विभागाचे प्रमुख डॉ. चंद्रशेखर साळुंखे, आयटी विभागप्रमुख प्रा. सचिन भोसले, प्रा. संजेली बुटाला यांनी विशेष परिश्रम घेतले.

Sunday, 8 Mar. 20 Punya Nagari

# आय.सी.एस.महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद

खेड, ९ मार्च (वार्ताहर)- येथील सहजीवन शिक्षण आय.सी.एस.महाविद्यालयात भूगोल, कॉमर्स आणि माहिती तंत्रज्ञानातील नवप्रवाह आणि शाश्वत विकास यावर आधारीत एकदिवशीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडु, पंजाब, गुजरात येथील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक सहभागी झाले होते. दि बॉम्बे जीऑग्राफीकल असोसिएशन आणि आय.सी.एस.महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

या राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन सोहळ्यास सहजीवन शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी मंगेशभाई बुटाला, आय.सी.एस.कॉलेजच्या गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन ॲड.आनंदराव भोसले यांच्यासह बॉम्बे जीऑग्राफीकल असो.च्या अध्यक्षा डॉ.सवितास्मिता चव्हाण, उपाध्यक्ष तेलंग, सेक्रेटरी प्रा.भारती उन्नती, सह्याद्री निसर्ग मित्रचे अध्यक्ष भाऊ काटदरे यांच्यासह उंडे कॉलेज विक्रमगडचे प्राचार्य डॉ.हेमंत पेडणेकर, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक सुधीर पुराणिक, विद्यालंकार कॉलेजचे उपप्राचार्य प्रा.असिम रामपुरवाला, देवकर, सहजीवन शिक्षण संस्थेच्या मदनभाई सुरा इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटचे डायरेक्टर डॉ.प्रसाद भणगे, प्राचार्य डॉ.जी.बी.सारंग आदी मान्यवर उपस्थित होते.

सहजीवन शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी मंगेशभाई बुटाला यांनी या परिसंवादाच्या उपक्रमाचे स्वागत करुन अशा स्वरुपाच्या परिसंवादाच्या आयोजनामुळे विचारांची देवाणघेवाण तर होतेच याशिवाय महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासासाठी मदत होत असल्याचे नमूद केले.

Ratnagiri Times - 10th Mar. 20

# 'आयसीएस'मध्ये परिसंवाद उत्साहात

खेड : आय.सी.एस. महाविद्यालयात 'भूगोल, वाणिज्य व माहिती तंत्रज्ञानातील नवप्रवाह व शाश्वत विकास' या विषयावर राष्ट्रीय परिसंवाद पार पडला. यात महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडू, पंजाब, गुजरात येथील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक सहभागी झाले होते.

याप्रसंगी सहजीवन शिक्षण संस्था सचिव मंगेश बुटाला, गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन ॲड. आनंद भोसले, बॉम्बे जिऑग्राफिकल असो.च्या अध्यक्षा डॉ. सविता चव्हाण, उपाध्यक्ष तेलंग, सेक्रेटरी प्रा. भारती उन्नी, सह्याद्री निसर्गमित्रचे अध्यक्ष भाऊ काटदरे, उंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत पेडणेकर, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक सुधीर पुराणिक, विद्यालंकार महाविद्यालयाचे उपप्राचार्य असिम रामपूरयाला, देवकर, डॉ. प्रसाद भणगे, प्राचार्य डॉ. जी. बी. सारंग उपस्थित होते. या परिसंवादात विविध राज्यातील आलेल्या ९०हून अधिक संशोधन पेपरचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

Monday, 9 Mar. 20
Tarun Bharat